# मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन 'टनेलिंग प्रोजेक्ट ऑफ दि इअर' पुरस्काराने सन्मानित

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ.) ला 'टनेलिंग प्रोजेक्ट ऑफ दि इअर' आणि 'सेफ्टी इनिशिएटिव्ह ऑफ दि इअर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. टनेलिंग अँड अंडरग्राऊंड स्पेस अवॉर्ड्स २०२३ मध्ये प्रतिष्ठित अशा टनेलिंग असोसिएशन ऑफ इंडिया (टीएआय) द्वारे हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

"टनेलिंग प्रोजेक्ट ऑफ दि इअर श्रेणीमध्ये पुरस्कार मिळणे ही एक सन्मानाची गोष्ट आहे. अत्यंत कठिण आणि गर्दीच्या भागातून जाणाऱ्या सरिखनामुळे मेट्रो-३ हा प्रकल्प एक अभियांत्रिकी अविष्कार ठरला आहे", असे मत मुं.मे.रे.कॉ.च्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी व्यक्त केले.

"गेल्या ७ वर्षांतील २५० दशलक्ष तासामागे कामगारांना कामाच्या ठिकाणी दुखापत होण्याचा सरासरी दर ०.३४ इतका आहे. जो की आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रकल्पांमधील



दुखापतीच्या घटनांच्या सरासरी दर ०.५ च्या मानाचे खूपच कमी आहे", असे यावेळी मुं.मे.रे.कॉ. चे संचालक (प्रकल्प) सुबोध गुप्ता म्हणाले.

मुंबईत आयोजित "टनेलिंग आणि अंडरग्राऊंड स्पेसमध्ये हवामानातील लवचिकता आणि टिकाऊपणा" या विषयावर सुरू असलेल्या टनेलिंग एशिया २०२३ आंतरराष्ट्रीय परिषदेत हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री तसेच पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी गुरुवारी पार पडलेल्या परिषद उद्घाटन सत्रात सहभागी झाले होते.